## प्रेस नोट

दि.२६/०५/२०२२

काशीमीरा पोलीस स्टेशन, मिरा रोड पुर्व, एम.बी.व्ही.व्ही.पोलस आयुक्तालयातील सहायक पोलीस निरीक्षक यांना लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :— | काशीमीरा पोलीस स्टेशन |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | महेंद्र अप्पाजी भामरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, काशीमीरा पोलीस स्टेशन, मीरा भाईदर वसई विरार, पोलस आयुक्तालय. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | २५०००/—रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | २५०००/—रू. |
| थोडक्यात हकीगत | :— | यातील तक्रारदार यांचे विरुध्द काशीमीरा पोलीस स्टेशन गुन्हा रजि कं. ७१४/२०२०, भा.दं. वि.कलम ३७६(२)(एन),४१९,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांनी मा.हायकोर्ट, मुबंई यांचे कडुन दि.०५/१२/२०२० रोजी अटकपुर्व जामिन घेतला आहे. नमुद गुन्हयातील फिर्यादी ही तक्रारदार यांचेकडे पैशाची मागणी करीत आहे. त्यावरुन ती तक्रारदार यांचे विरुध्द काशीमीरा पोलीस ठाण्यात तकारी दाखल करत असते. सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी भामरे हे वरील नमुद गुन्हयाचे चार्जशिट दाखल करण्या करीता तसेच गुन्हयातील फिर्यादी ही तक्रारदार यांचे विरुध्द गुन्हे दाखल करत असल्याने तीचे बरोबर समझौता करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ५,००,०००/—(पाच लाख )रुपयची मागणी करीत आहेत. त्यापुर्वी अँडव्हान्स म्हणुन तक्रारदार यांचेकडे ५०,०००/—रुपयाची मागणी लोकसेवक भामरे साहेब करीत असलेबाबत तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात दि. २५/०५/२०२२ रोजी लेखी तक्रार नोंदवीली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२५.०५.२०२२ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे २५०००/—रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. सापळा कारवाईमध्ये सदरची रक्कम दि.२६/०५/२०२२ रोजी घेवुन येण्यास सांगितली. दि.२६/०५/२०२२ रोजी असीबी ठाणे युनिटने काशीमीरा पोलीस स्टेशन येथे सापळयाचे आयोजन केले. त्यावेळी लोकसेवक महेंद्र अप्पाजी भामरे यांनी तक्रारदार यांचेकडून २५०००/—रु.लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लागलीच ताब्यात घेवुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी—मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


१) संपर्क पत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई—मेल आयडी :—spacbthane@mahapolice.gov.in
४) अँप्लीकेशन :—acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :— १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :—०२२—२०८१३५९९


पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(सुरेश गणपत घोपडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे